# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-14.05.2026** **वार-गुरुवार**

---

**<u>छत्रपती संभाजी महाराज</u>**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन केलं जात आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांना विनम्र अभिवादन केलं आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुण्यातल्या डेक्कन जिमखाना परिसरातल्या ऐतिहासिक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या नूतनीकरणाचं भूमिपूजन आज केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झालं. पुणे महानगरपालिकेनं या प्रकल्पासाठी तीन कोटी चोवीस लाख रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. संभाजी प्रतिष्ठानच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. धर्मरक्षणासाठी संभाजी महाराजांनी आपलं आयुष्य पणाला लावलं हे स्मारक आगामी काळात तरुणांना नवी दिशा देईल असं प्रतिपादन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी केलं. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे तसंच अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण घेतले. पुणे महानगरपालिकेच्या पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील मुळा-मुठा नदीचा विकासासाठी तीन शासकीय जमिनी विनामुल्य हस्तांतरित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. मुळा-मुठा संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल दरम्यानची नदी पात्रातील, तसंच बॉटेनिकल गार्डन, महिला बाल सुधार गृहाची जमीन पुणे महापालिकेला दिली जाणार आहे.

**<u>एसआयआर</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज 16 राज्य आणि 3 केंद्र शासित प्रदेशातल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. महाराष्ट्र आणि दिल्लीसह विविध राज्यांचा यात समावेश आहे.

**<u>गडकरी</u>**

देशात इंधन पुरवठ्याचं संभाव्य संकट लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधन बचतीचं आवाहन केलं आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी, इंधन बचतीचा संदेश देत पुणे दौऱ्यात बसने प्रवास केला. आपल्या अधिकृत ताफ्यातील वाहनांची संख्या त्यांनी कमी केली आहे. गडकरी यांनी आज संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.

पुणे महापालिका प्रशासनानेही पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत वाहनांच्या वापरात सुमारे 30 टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर करावा, कार शेअरिंगसारख्या पर्यायांचा अवलंब करावा आणि इंधन बचतीसाठी अन्य उपाययोजना राबवाव्यात, यासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जात असल्याचं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं. पुणे महापालिकेत आठवड्यातून एक दिवस 'सार्वजनिक वाहतूक दिन' पाळावा, अशी मागणी महापौर मंजूषा नागपुरे यांनी आयुक्तांना पत्राद्वारे केली आहे.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जेची बचत करण्यासाठी विविध उपाय योजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच झाली. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणारी कार्यपद्धती महापालिकेने स्वीकारणे आवश्यक आहे, असं आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यावेळी म्हणाले.

**<u>संयुक्त आराखडा</u>**

मुळा, मुठा, पवना आणि इंद्रायणी नद्यांच्या काठावर मोठ्या प्रमाणात वाढलेल्या लोकवस्तीमुळे सांडपाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. खडकवासला आणि पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी मिसळलं जात आहे, हे रोखण्यासाठी पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण संयुक्त कृती आराखडा तयार करणार आहेत. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळवण्याचा निर्णय पुणे महापालिकेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

**<u>एचएसआरपी-मुंबई</u>**

राज्यात येत्या एक जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवण्यासाठी वाहनधारकांना येत्या 30 जूनपर्यंतची मुदत देण्यात आल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. या नियमाचं उल्लंघन करणाऱ्यांना एक हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे.

**<u>रोजगार मेळावा</u>**

पिंपरी चिंचवडमध्ये सांगवी इथं आज रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार विभागानं या रोजगार मेळाव्याचं आयोजन केलं होतं. विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार यांच्या हस्ते याचं उद्घाटन झालं. पुणे जिल्ह्यातील 120 हून अधिक नामांकित औद्योगिक कंपन्यांमधील 5 हजारपेक्षा जास्त रोजगार संधीसाठी या रोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 25 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**